बुद्धमुर्तीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. अगदी अशाचप्रकारे भगवान बुद्धांच्या मुर्तीचे शिल्पकारसुद्धा डॉ. आंबेडकरच होते. कोणत्याही केलविषयी त्यांना फार आदर असे. मुर्ती कलेविषयीसुद्धा त्यांना आकर्षण होते. बुद्ध हे त्यांचे स्फुर्तीस्थान होते. बुद्धाची प्रतिमा पाहण्यात ते दंग होत असत. प्रतिमा पाहताना जणू काय ते प्रत्यक्ष बुद्धालाच भेटत असावेत. गौतम बुद्धाच्या व्यक्तीमत्वाबद्दल आणि त्यांच्या विचारांबद्दल त्यांना अतिशय प्रेम होते. बुद्धासंबंधी विषयावर चर्चा करताना त्यांना फार आनंद मिळत असे. तासन्तास ते बुद्ध व धम्मा वर बोलत असत. ते बुद्धाच्या विचाराने भारावून गेलेले होते. म्हणूनच की काय त्यांनी शिल्पकला आत्मसात केली होती. त्यांच्या जीवनातील एका प्रसंगावरुन त्यांना शिल्पकलेविषयी असलेले आकर्षण व्यक्त होते.

आर. बी. मडिलगेकर अर्फ बापू हे निपाणीचे चांगले शिल्पकार होते. त्यांनी बाबासाहेबांचा पुतळा बनविण्याचे ठरविले होते. परंतु प्रथमत: बाबासाहेबांनी त्यांना पुतळा बनविण्यास संमती दिली नाही. काही दिवसांनी बाबासाहेब काही खास कामानिमीत्त मुंबईला गेले. या अवधीत बापूंना बाबासाहेबांच्या घरी भिंतीवर बुद्धाचा फोटो लावलेला दिसला. बापूंनी त्या फोटोचे मॉडेल बनविण्याचे ठरविले. त्या फोटोच्या सहाय्याने बापूंनी रात्रंदिवस मेहनत करुन बुद्धांचे मॉडेल तयार करुन ठेवले. डॉ. आंबेडकर मुंबईहून परत दिल्लीला आल्यानंतर बापूंनी तयार केलेले बुद्धाचे मॉडेल त्यांना दाखविण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी ते बुद्धाचे मॉडेल पाहिले. ते मॉडेल त्यांना खूप आवडले. त्यांनी बापूंची खूप प्रशंसा केली.

यानंतर त्यांनी बापू व वराळे यांच्या आग्रहास्तव त्यांचा पुतळा बनविण्यासाठी मूक संमती दिली. बापूंनी खूप मेहनत घेऊन एका महिन्याच्या आत डॉ. आंबेडकरांचा हुबेहुब पुतळा तयार केला. तो पुतळा बाबासाहेबांना खूप आवडला होता. पुढे तो पुतळा ब्राँझचा तयार करण्यात आला व त्या पुतळ्याची स्थापना सिद्धार्थ कॉलेजच्या ग्रंथालयात केली.

या घटनेनंतर डॉ. आंबेडकरांच्या मनात मुर्तीबद्दल एक वेगळेच आकर्षण निर्माण झाले. तशी त्यांना पुर्वीपासूनच शिल्पकलेची आवड होती. इतिहासाची पाने लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिल्पकलासुद्धा आत्मसात करुन घेतली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या संकल्पनेतील बुद्ध हवा होता. भगवान बुद्धाची मुर्ती आपण स्वत: तयार करावी असे त्यांना वाटत असे. एकदा ते बापूंना म्हणाले, "बापू! मला भगवान बुद्धाचा पुतळा स्वत: तयार करता आला पाहिजे. तो तयार करण्यासाठी तुम्ही मला शिकविले पाहिजे." मुर्ती बनविण्यासाठी लागणारा चिखल क्ले बापूंनी सोबतच नेला होता. बापूंनी तो चिखल बाबासाहेबांच्या जवळ आणला. काही चिखल त्यांनी हातात घेतला. सुरुवातील त्या चिखलाचा एक गोळा तयार करण्यात आला. तो चिखलाचा गोळा बापूंनी बाबासाहेबांना ओंजळीमध्ये धरण्यास सांगितला. बाबासाहेबांनी आपल्या दोन्ही हाताच्या ओंजळीत तो चिखलाचा गोळा धरला. त्या गोळ्याच्या मध्यावर दोन्ही हाताचे अंगठे जवळ आणून ते ओंजळीतल्या गोळ्यावर दाबावयास सांगितले. त्याप्रमाणे बाबासाहेबांनी केले. दोन्ही अंगठे दाबल्यामुळे ज्या खाचा तयार झाल्या होत्या, त्या डोळ्यांच्या खाचा होत्या. नंतर खाचेच्या खालच्या भागावर गाल व दोन्ही अंगठ्याच्या मधला भाग म्हणजेच नाक समजून ते तयार केले. नाकाच्या शेजारी खालच्या बाजूस तोंडाची आकृती तयार केली. या सर्व गोष्टी झाल्यानंतर मुखवटा तयार करण्याचे ज्ञान बाबासाहेबांनी अवघ्या १५ मिनीटांत आत्मसात केले. आपण मुर्ती तयार करण्याचे ज्ञान आत्मसात केलेले पाहून त्यांना फारच आनंद झाला. नंतर भगवान बुद्धाची मुर्ती तयार करण्यात ते गुंतून राहिले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही दिवसांतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाची मुर्ती स्वत: तयार केली. त्यांना हवा असलेला

बुद्ध त्यांनी मुर्तीत साकार केला होता. गौतम बुद्धाविषयी त्यांना फारच आकर्षण होते. त्यांच्या अंतःकरणात बुद्धाविषयी जे रात्रंदिवस चिंतन चाललेले होते, त्यालाच त्यांनी मुर्तीरुपात आकारबद्ध केले होते. मुर्ती तयार करण्याचे एक विलक्षण आकर्षण डॉ. आंबेडकरांच्या मनात निर्माण झाले होते.

मुर्तीकलेतील विविध भावसौदर्य ते खुलवून सांगत असत. कितीतरी पुतळे ते बनवून घेणार होते. पुतळे भावपूर्ण व सुंदर असावेत असा त्यांचा खास कटाक्ष होता. शिल्पकलेत बाबासाहेब चांगलेच रममाण होते. कलेतील नेमकी सौंदर्यस्थळे ते जाणत होते. १० फुट उंचीचा व्याख्यात मुद्रा असलेला बुद्धाचा पुतळा तयार करुन तो कॉलेजसमोरील बागेत त्यांना बसवायचा होता. यशोधरा, सम्राट अशोक, विश्वमित्र, कपिलमुनी आणि कितीतरी महान व्यक्तींच्या मुर्ती बनविण्याचा आदेश त्यांनी दिलेला होता. बुद्धाचा चेहरा जसा भारतीय असावा आणि त्यांची व्याख्यात मुद्रा असावी हे त्यांनी जसे सांगितले होते, त्याचप्रमाणे यशोधरेच्या पुतळ्यासंबंधीही त्यांनी एकच मूल झालेली म्हणजे ती कुमारिकाही दिसू नये व वयस्कही दिसू नये अशा सूचना त्यांनी दिल्या होत्या. विश्वमित्र आणि कपिलमुनी या दोघांनाही दाढी आहे; पण या दाढीतला फरक त्यांनी सांगितला होता. दाढीवरुनही विश्वमित्राचा रागीट स्वभाव आणि कपीलमुनीचा शांत भाव व्यक्त झाला पाहिजे असे त्यांणी सांगितले होते. मुर्त्या तयार करण्यासाठी त्यांनी विविध फोटोंची पारख केली होती. पुतळे तयार करण्याची सर्व कामगिरी त्यांनी बापूंवर सोपविली होती. औरंगाबाद येथील मिलींद महाविद्यालयाच्या समोरील बागेत हे पुतळे बाबासाहेब बसवणार होते.

मुर्तीतूनही समोरच्या व्यक्तीच्या मनात आदरभाव उत्पन्न होतो. मुर्तीबद्दल असणारा भाव व्यक्त करण्यासाठी आपण तिची पूजा करतो. लोकांना मुर्तीकलेतूनही ज्ञान मिळावे म्हणूनच की काय, इतिहासाची पाने चाळता चाळता इतिहासच बदलवून टाकणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाने वयाच्या उत्तरार्धातही शिल्पकला आत्मसात केली होती. स्वतःच्या पवित्र हाताने चिखलाच्या गोळ्याला आकार देऊन त्यात बुद्धमुर्ती साकार केली होती. देशाची घटना लिहिणारे हात मुर्ती घडवीत होते. महान व्यक्तींचे पुतळे स्थापन करण्याची मोहिमच जणू त्यांनी हाती घेतली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कलेचे उपासक होते. कोणतीही कला किंवा ज्ञान आत्मसात करण्यासाठी त्यांनी कधीही मागे-पुढे पाहिले नाही. विविध कला आत्मसात करुन घेण्यासाठी ते केव्हाही तयार असत. आयुष्यभर ज्ञानसागरात उभे असतानाही त्यांची ज्ञानाची तहान काही भागली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्येचे उपासक होते. त्यांच्या अखंड ज्ञान तपश्चर्येमुळे आयुष्यभर ते विद्यार्थीच राहिले. न भूतो न् भविष्यती असे ते आजन्म विद्यार्थी होते. म्हणूनच ते बुद्धमुर्तीचे शिल्पकार ठरले.

राजरत्न ठोसर